LOKMAT TIMES

LOKMAT TIMES ● Anchor

# Critical brain surgery performed successfully

## SMBT's Neurologist and Spine Specialist Dr Hitendra Gadkari removes tumors from friend's brain

LOKMAT NEWS NETWORK
NASHIK, FEB 1

Neurologist and spine specialist in SMBT Hospital Dr Hitendra Gadkari and his classmate, famous anaesthesiologist Dr Pankaj Gupta performed a critical brain surgery successfully on another classmate recently.

According to details, Dr Hitendra Gadkari, Dr Pankaj Gupta and District Health Officer Dr Yogesh (name changed), share a long-standing friendship as former classmates.

For the past few days, Dr Yogesh had been experiencing headaches and dizziness. Concerned about his health, he consulted a local doctor, who advised him to undergo an MRI scan of the brain. The scan revealed a tumor in his brain, prompting him to seek expert opinions from neurologists and spine specialists in Mumbai and Pune. All the consulted doctors recommended that surgery was necessary.

Dr Yogesh then approached his classmate Dr Hitendra Gadkari, who is a neurologist and spine specialist at SMBT Hospital. He narrated the entire sequence of events, after which Dr Gadkari advised him to undergo a series of tests.

The results revealed that the tumour had grown to some extent, and it was diagnosed as an acoustic neuroma. Given the condition, Dr Gadkari recommended immediate surgery to remove the tumor as soon as possible.

In any surgery, the role of an anaesthetist is crucial. Nashik-based anaesthetist and member of the Indian Society of Anaesthesiologists, Dr Pankaj Gupta, stepped in to assist.

Coincidentally, Dr Gupta was also a classmate of Dr Gadkari and Dr Yogesh, making this an extraordinary moment of friendship and teamwork. The friends decided that Dr Yogesh would undergo surgery in Nashik, aiming to help him recover swiftly. The surgery was highly complex, but the bond of friendship was even stronger.

The surgery, which began at 9 am, continued until 3 pm and was successful.

**The patient had a large tumor, measuring 4x3 cm, attached to the brainstem. The tumor was located near critical blood vessels in the brain. Using the advanced CUSA (Cavitron Ultrasonic Surgical Aspirator) machine, the tumor was successfully removed completely. Following the surgery, there was no need to keep the patient on a ventilator. Dr Gadkari mentioned that SMBT Hospital will offer free treatment to general patients through brain and spine endoscopic surgeries, ensuring accessible care for those in need.**



Neurologist and spine specialist in SMBT Hospital Dr Hitendra Gadkari, Dr Yogesh (name changed) and anaesthesiologist Dr Pankaj Gupta.

> “Brain and spine treatments are often expensive, but SMBT Hospital is a place where most treatments are offered free of charge under government schemes, and treatments that aren't covered by the scheme are provided at very affordable rates. I have been treating brain and spine disorders for over 30 years, performing 30-40 surgeries each month. Today, after successfully treating my friend, I feel a sense of fulfilment in this service
>
> - Dr Hitendra Gadkari, Neurologist and Spine Specialist, SMBT Hospital

# दोघा मित्रांकडून तिसऱ्यावर मेंदूची क्लिष्ट शस्त्रक्रिया

## एसएमबीटीचे डॉ. गडकरी यांच्याकडून यशस्वी शस्त्रक्रिया

**नाशिक, ता. १ :** दुःख अडवायला उंबऱ्यासारखा, मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा. कवी अनंत राऊत यांनी लिहिलेली ही कविता मित्रांच्या नात्याची, त्यांच्याप्रती असलेल्या अनोख्या प्रेमाची आणि अतूट विश्वासाची नेहमीच साक्ष देत असते. अशीच घटना नाशकात घडली आणि चाळीस वर्षांपूर्वीचे वर्गमित्र असलेल्या दोघा मित्रांनी तिसऱ्या मित्राच्या मेंदूवर क्लिष्ट शस्त्रक्रिया केली.

एसएमबीटी हॉस्पिटलचे मेंदू व मणकेविकार तज्ज्ञ डॉ. हितेंद्र गडकरी, भूलतज्ज्ञ डॉ. पंकज गुप्ता व जिल्हा वैद्यकीय अधिकारी असलेले डॉ. योगेश (नाव बदललेले) हे वर्गमित्र आहेत. डॉ. योगेश यांना गेल्या काही दिवसांपासून डोकेदुखी, तोल जाणे असा त्रास होत होता. डॉक्टरांनी त्यांना मेंदूचा एमआरआय करण्यास सांगितले. दरम्यान, मेंदूत गाठ असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर डॉ. योगेश यांनी मुंबई आणि पुण्यातील काही तज्ज्ञांचा सल्ला घेतला. सर्वच डॉक्टरांनी त्यांना ऑपरेशनचा सल्ला दिला.

डॉ. योगेश हे एसएमबीटी हॉस्पिटल येथे मेंदू व मणकेविकार तज्ज्ञ म्हणून कार्यरत असलेले त्यांचे वर्गमित्र डॉ. हितेंद्र गडकरी यांच्याकडे आले. त्यांनी सर्व तपासण्या करण्यास सांगितल्या. त्यांना ॲकोस्टिक न्युरोमाची गाठ असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे ती गाठ काढण्याचा सल्ला त्यांनी डॉ. योगेश यांना दिला. डॉ. गडकरी यांच्या मदतीला भूलतज्ज्ञ डॉ. पंकज गुप्ता होते. योगायोग असा की. डॉ गुप्ता हेदेखील डॉ. गडकरी आणि डॉ. योगेश यांचे वर्गमित्र होते. दोघा मित्रांसमोर आता तिसऱ्या डॉक्टर मित्रावर शस्त्रक्रिया करणे मोठे करण्याचे आव्हान होते. सकाळी ९ वाजता सुरु झालेली शस्त्रक्रिया दुपारी तीन वाजेपर्यंत चालली. शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याचे डॉ. गडकरी आणि डॉ. गुप्ता यांनी नातेवाईकांना सांगितले. शस्त्रक्रियेनंतर डॉ. योगेश शुद्धीवर आले आणि मैत्रीचा आनंदोत्सव या तिघांसह उपस्थित सर्वांनीच साजरा केला.

# एसएमबीटीचे मेंदू व मनकेविकार तज्ज्ञ डॉ. हितेंद्र गडकरी यांनी पार पाडली यशस्वी शस्त्रक्रिया

**नाशिक (प्रभर प्रतिनिधी) :–** दुःख अडवायला उंबऱ्यासारखा, मित्र वणव्यामध्ये गारव्या सारखा. कवी अनंत राऊत यांनी लिहिलेली ही कविता मित्रांच्या नात्याची, त्यांच्याप्रती असलेल्या अनोख्या प्रेमाची आणि अतूट विश्वासाची नेहमीच साक्ष देत असते. अशीच घटना नाशकात घडली आणि चाळीस वर्षांपूर्वीचे वर्गमित्र असलेल्या दोघा मित्रांनी तिसऱ्या मित्राच्या मेंदूवर क्लिष्ट शस्त्रक्रिया केली. या अनोख्या घटनेची नाशकात चर्चा असून डॉक्टरांच्या अनोख्या यारी–दोस्तीचे सध्या कौतुक केले जात आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, एसएमबीटी हॉस्पिटलचे मेंदू व मणकेविकार तज्ज्ञ डॉ. हितेंद्र गडकरी, भूलतज्ज्ञ डॉ. पंकज गुप्ता व जिल्हा वैद्यकीय अधिकारी असलेले डॉ. योगेश (नाव बदललेले) हे वर्गमित्र आहेत. डॉ. योगेश यांना गेल्या काही दिवसांपासून डोकेदुखी, तोल जाणे असा त्रास होत होता. त्यांनी जवळच्या एका डॉक्टरांना दाखवले व येथील डॉक्टरांनी त्यांना मेंदूचा एमआरआय करण्यास सांगितले. दरम्यान, मेंदूत गाठ असल्याचे या तपासणीमध्ये निष्पन्न झाल्यानंतर डॉ. योगेश यांनी मुंबई आणि पुण्यातील काही मेंदू आणि मणकेविकार तज्ज्ञांचा सल्ला घेतला. येथील सर्वच डॉक्टरांनी त्यांना ऑपरेशन करावे लागेल याबाबत सांगितले.

डॉ. योगेश हे एसएमबीटी हॉस्पिटल येथे मेंदू व मणकेविकार तज्ज्ञ म्हणून कार्यरत असलेले त्यांचे वर्गमित्र डॉ. हितेंद्र गडकरी यांच्याकडे आले. त्यांनी घडलेला सर्व घटनाक्रम सांगितला. त्यानंतर डॉ. गडकरी यांनी त्यांच्या सर्व तपासण्या करण्यास सांगितल्या. यामध्ये ही गाठ काही प्रमाणात वाढल्याचे निदर्शनास आले. त्यांना ॲकोस्टिक न्युरोमाची गाठ असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे लवकरात लवकर ही गाठ काढून टाकण्याचा सल्ला त्यांनी डॉ. योगेश यांना दिला. कुठल्याही शस्त्रक्रियेसाठी भूलतज्ज्ञाची भूमिका महत्त्वाची असते तर ही भूमिका कोण पार पाडणार ? असा प्रश्न उपस्थित असताना डॉ. गडकरी यांच्या मदतीला नाशिकचे प्रख्यात भूलतज्ज्ञ व भारतीय भूलतज्ज्ञ असोसिएशनचे डॉ. पंकज गुप्ता धावून आले. योगायोग असा की. डॉ गुप्ता हेदेखील डॉ. गडकरी आणि डॉ. योगेश यांचे वर्गमित्र असल्याने यारी–दोस्तीच्या या अनोख्या प्रसंगाची सुरुवात झाली. दोघा मित्रांसमोर आता तिसऱ्या डॉक्टर मित्रावर शस्त्रक्रिया करणे मोठे आव्हान होते. प्रत्येक व्यक्तीला जीवनात अनेक प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागते. अशा वेळी मित्राचे महत्त्व वाढते. असे मित्र नेहमीच तुम्हाला धीर देतात आणि कठीण परिस्थितीतही तुमची साथ सोडत नाहीत. मित्रांनी निर्णय घेतला की, डॉ.



योगेश यांच्यावर नाशकात शस्त्रक्रिया करून त्यांना लवकर यातून बाहेर काढू. शस्त्रक्रिया अतिशय क्लिष्ट होती पण मैत्रीची पकड मजबूत होती. सकाळी ९ वाजता सुरु झालेली शस्त्रक्रिया दुपारी तीन वाजेपर्यंत चालली. शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याचे डॉ. गडकरी आणि डॉ गुप्ता यांनी बाहेर येऊन नातेवाईकांना सांगितले. डॉ. योगेश यांना शुद्धीवर येण्यासाठी आणखी काही वेळ द्यावा लागणार असल्याने सर्वजण ते शुद्धीवर येईपर्यंत तिथेच थांबून होते. अखेर डॉ. योगेश शुद्धीवर आले आणि मैत्रीचा आनंदोत्सव या तिघांसह उपस्थित सर्वांनीच साजरा केला. या घटनेची माहिती सर्वदूर पोहोचताच अनेकांनी या अतूट मैत्रीचे कौतुक केले. गेल्या काही दिवसांपासून नाशकात या अनोख्या घटनेची चर्चा होताना दिसते आहे. मेंदू आणि मणकेविकारावर उपचार महागडे आहेत, परंतु एसएमबीटी हॉस्पिटल अशी एक जागा आहे, जिथे बहुतांश उपचार शासकीय योजनेअंतर्गत मोफत होतात तर योजनेत न बसणारे उपचार अतिशय माफक दरात होतात. गेल्या ३० पेक्षा अधिक वर्षांपासून मेंदू आणि मणकेविकार उपचार मी करत आहे. दर महिन्यात माझ्या हातून ३०–४० मेंदू व मणकेविकार शस्त्रक्रिया होतात. आज एका मित्रावर यशस्वी उपचार केल्याने या सेवेचे सार्थक झाल्याचा आनंद आहे, असे मेंदू आणि मणकेविकार तज्ज्ञ डॉ. हितेंद्र गडकरी म्हणाले.

**अशी झाली शस्त्रक्रिया–** लहान मेंदूला चिकटलेली चार बाय तीन सेमीची मोठी गाठ होती. मेंदूतील महत्वाच्या नसांना चिकटलेल्या या गाठीला सोडवून क्युसा या अत्याधुनिक मशीनद्वारे संपूर्णपणे काढण्यास यश आले. या शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला व्हेंटीलेटरवर ठेवण्याची गरज पडली नाही. एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये ब्रेन व स्पाईन एन्डोस्कोपिक सर्जरीच्या माध्यमातून सर्वसामान्य रुग्णांना मोफत उपचारांचा लाभ होणार असल्याचे डॉ. गडकरी म्हणाले.

## साधूग्रामच्या अतिरिक्त जागेसाठी मेरीची

(पान १ वरून) सुचना अधिकार्यांना दिल्या. मनपाच्या आयुक्त

अहिल्यानगर सिटी 01-02-2025

## दोघांनी केली मित्राच्या मेंदूची क्लिष्ट शस्त्रक्रिया



डॉ. हितेंद्र गडकरी व भूलतज्ज्ञ डॉ. पंकज गुप्ता यांनी मित्रावर यशस्वी शस्त्रक्रिया केली.

**नाशिक** | ते तिघेही डॉक्टर. एक मेंदू व मणकेविकार तज्ज्ञ, दुसरा भूलतज्ज्ञ, तर तिसरा जिल्हा वैद्यकीय अधिकारी.. ४० वर्षांपूर्वी एकत्र शिकले, वाढले. उच्चशिक्षित झाले. मात्र, त्यातील एकाच्या मेंदूत गाठ असल्याचे निदान झाले. शस्त्रक्रियेशिवाय पर्याय नव्हता. अशा संकटाच्या वेळी इतर दोन मित्र मदतीला धावले.. अन् ही शस्त्रक्रिया सहजशक्य झाली. त्यातूनच कवी अनंत राऊत यांच्या 'दुःख अडवायला उंबऱ्यासारखा, मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा...' या काव्यपंक्तीची प्रचिती आली. एसएमबीटी हॉस्पिटलचे मेंदू व मणकेविकार तज्ज्ञ डॉ. हितेंद्र गडकरी, भूलतज्ज्ञ डॉ. पंकज गुप्ता व जिल्हा वैद्यकीय अधिकारी असलेले डॉ. योगेश (नाव बदललेले) अशी या वर्गमित्रांची नावे.. जिल्हा वैद्यकिय अधिकारी असलेले डॉ. योगेश यांना काही दिवसांपासून डोकेदुखी, तोल जाणे असा त्रास होत होता. त्यांनी जवळच्या डॉक्टरांना दाखवले असता, त्यांनी मेंदूचा एमआरआय करण्यास सांगितले. त्यात मेंदूत गाठ असल्याचे निष्पन्न झाले. डॉ. योगेश यांनी पुण्या-मुंबईतील तज्ज्ञांचा सल्ला घेतला असता, सर्वच डॉक्टरांनी त्यांना शस्त्रक्रिया करण्यास सांगितले. डॉ. योगेश हे एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये मेंदू व मणकेविकार तज्ज्ञ असलेले त्यांचे वर्गमित्र डॉ. हितेंद्र गडकरी यांच्याकडे आले. डॉ. गडकरी यांनी तपासण्या केल्या असता, 'अॅकोस्टिक न्युरोमा'ची गाठ असल्याचे निष्पन्न झाले. डॉ. गडकरी यांच्या मदतीला नाशिकचे भूलतज्ज्ञ डॉ. पंकज गुप्ता धावून आले. योगायोग असा, की डॉ. गुप्ता हेदेखील डॉ. गडकरी व डॉ. योगेश यांचे वर्गमित्रच होते. डॉ. योगेश यांच्यावर नाशकात शस्त्रक्रिया करण्याचे ठरले. सकाळी ९ वाजता सुरू झालेली शस्त्रक्रिया दुपारी तीन वाजेपर्यंत चालली. शस्त्रक्रिया यशस्वी झाली. डॉ. योगेश शुद्धीवर येईपर्यंत सगळे तिथेच थांबून होते.

# मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा!

## दोघा मित्रांकडून तिसऱ्यावर मेंदूची क्लिष्ट शस्त्रक्रिया

**लोकनामा प्रतिनिधी**

**नाशिक** : मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा, असे म्हटले जाते. अशीच घटना नाशिकमध्ये घडली. ४० वर्षांपूर्वीचे वर्गमित्र असलेल्या दोघा मित्रांनी तिसऱ्या मित्राच्या मेंदूवर क्लिष्ट शस्त्रक्रिया केली. या अनोख्या घटनेची शहरात चर्चा आहे. डॉक्टरांच्या या दोस्तीचे कौतुक केले जात आहे.

एसएमबीटी हॉस्पिटलचे मेंदू व मणकेविकारतज्ज्ञ डॉ. हितेंद्र गडकरी, भूलतज्ज्ञ डॉ. पंकज गुप्ता व जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ. योगेश (नाव बदललेले आहे) हे वर्गमित्र आहेत. डॉ. योगेश यांना गेल्या काही दिवसांपासून डोकेदुखी, तोल जाणे असा त्रास होत होता. डॉक्टरांनी त्यांना मेंदूचा एमआरआय करण्यास सांगितले. मेंदूत गाठ असल्याचे या तपासणीत निष्पन्न झाले. डॉक्टरांनी त्यांना शस्त्रक्रिया करावी लागेल याबाबत सांगितले. ते एसएमबीटी हॉस्पिटल येथे मेंदू व मणकेविकारतज्ज्ञ म्हणून कार्यरत त्यांचे वर्गमित्र डॉ. हितेंद्र गडकरी यांच्याकडे आले. त्यांनी सर्व तपासण्या करण्यास सांगितल्या. यात ही गाठ काही प्रमाणात वाढल्याचे निदर्शनास आले. त्यांना अॅकोस्टिक न्युरोमाची गाठ असल्याचे निदान झाले. त्यामुळे लवकरात लवकर ही गाठ काढून टाकण्याचा सल्ला दिला. नाशिकचे प्रख्यात भूलतज्ज्ञ व भारतीय भूलतज्ज्ञ असोसिएशनचे डॉ. पंकज गुप्ता मदतीला धावून आले.



> मेंदू व मणकेविकारावर उपचार महागडे आहेत. पण एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये बहुतांश उपचार शासकीय योजनेंतर्गत मोफत होतात. योजनेत न बसणारे उपचार अतिशय माफक दरात होतात. गेल्या ३० पेक्षा अधिक वर्षांपासून मेंदू व मणकेविकारावर उपचार करीत आहे. दरमहा माझ्या हातून ३०-४० मेंदू व मणकेविकारावर शस्त्रक्रिया होतात.
>
> – **डॉ. हितेंद्र गडकरी,** मेंदू व मणकेविकारतज्ज्ञ, एसएमबीटी हॉस्पिटल

योगायोग असा की, डॉ. गुप्ता हेदेखील डॉ. गडकरी व डॉ. योगेश यांचे वर्गमित्र असल्याने यारी-दोस्तीच्या या अनोख्या प्रसंगाची सुरुवात झाली. दोघा मित्रांसमोर आता तिसऱ्या डॉक्टर मित्रावर शस्त्रक्रिया करणे मोठे आव्हान होते. सकाळी नऊ वाजता सुरू झालेली शस्त्रक्रिया दुपारी तीन वाजेपर्यंत चालली. शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याचे डॉ. गडकरी व डॉ. गुप्ता यांनी बाहेर येऊन नातेवाइकांना सांगितले. शुद्धीवर येईपर्यंत ते तिथेच थांबून होते. अखेर डॉ. योगेश शुद्धीवर आले. मैत्रीचा आनंदोत्सव या तिघांसह उपस्थित सर्वांनीच साजरा केला.

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

नाशिक आवृत्ती

epaper.deshdoot.com
03 Feb 2025 - Page 10

## 'एसएमबीटी'त दोघा डॉक्टर मित्रांकडून तिसऱ्यावर मेंदूची क्लिष्ट शस्त्रक्रिया

**नाशिक ।** चाळीस वर्षापूर्वीचे वर्गमित्र असलेल्या दोघा डॉक्टर मित्रांनी तिसऱ्या मित्राच्या मेंदूवर एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये क्लिष्ट शस्त्रक्रिया केली.

एसएमबीटी हॉस्पिटलचे मेंदू व मणकेविकार तज्ज्ञ डॉ. हितेंद्र गडकरी, भूलतज्ज्ञ डॉ. पंकज गुप्ता व जिल्हा वैद्यकीय अधिकारी असलेले डॉ. योगेश (नाव बदललेले) हे वर्गमित्र आहेत. डॉ. योगेश यांना गेल्या काही दिवसांपासून डोकेदुखी, तोल जाणे असा त्रास होत होता. त्यांना मेंदूत गाठ असल्याचे तपासणीमध्ये निष्पन्न झाल्यानंतर डॉ. योगेश हे एसएमबीटी हॉस्पिटल येथे मेंदू व मणकेविकार तज्ज्ञ म्हणून कार्यरत असलेले त्यांचे वर्गमित्र डॉ. हितेंद्र गडकरी यांच्याकडे आले. त्यांनी घडलेला सर्व घटनाक्रम सांगितला. त्यानंतर डॉ. गडकरी यांनी त्यांच्या सर्व तपासण्या करण्यास सांगितल्या.

यामध्ये ही गाठ काही प्रमाणात वाढल्याचे निदर्शनास आले. त्यांना अँकोस्टिक न्युरोमाची गाठ असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे लवकरात लवकर ही गाठ काढून टाकण्याचा सल्ला त्यांनी डॉ. योगेश यांना दिला. आणि लागलीच त्यांच्यावर यशस्वी शस्त्रक्रिया



करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला व्हेंटीलेटरवर ठेवण्याची गरज पडली नाही. एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये ब्रेन व स्पाईन एन्डोस्कोपिक सर्जरीच्या माध्यमातून सर्वसामान्य रुग्णांना मोफत उपचारांचा लाभ होणार असल्याचे डॉ. गडकरी म्हणाले.

# नवभारत

www.navbharatlive.com

## नाशिक में दो डॉक्टर मित्रों ने बचाई अपने मित्र की जान

■ **नाशिक,** ब्यूरो. दो दोस्तों ने मिलकर अपने तीसरे दोस्त की जटिल मस्तिष्क सर्जरी की. जिससे समय रहते उसकी जान बच गई. ये सभी चालीस साल पहले के सहपाठी हैं. एसएमबीटी अस्पताल के मस्तिष्क एवं रीढ़ विशेषज्ञ डॉ. हितेन्द्र गडकरी, एनेस्थिसियोलॉजिस्ट डॉ. पंकज गुप्ता और जिला चिकित्सा अधिकारी डॉ. योगेश (बदला हुआ नाम) सहपाठी हैं. डॉ. योगेश पिछले कुछ दिनों से सिरदर्द की समस्या से पीड़ित थे. उन्होंने इसे पास के एक डॉक्टर को दिखाया, उन्होंने उन्हें



मस्तिष्क का एमआरआई कराने को कहा. इस बीच, जांच में ब्रेन ट्यूमर का पता चलने पर डॉ. योगेश ने मुंबई और पुणे के कुछ मस्तिष्क और रीढ़ विशेषज्ञों से परामर्श किया. यहां सभी डॉक्टरों ने उसे बताया कि उसे सर्जरी करानी पड़ेगी. डॉ. योगेश को जल्द से जल्द ट्यूमर हटाने की सलाह दी. इसके बाद दोनों डाक्टरों ने मिल कर मस्तिष्क की सर्जरी की. इस पहल से उसकी जान बच गई.

Nashik plus Edition
Feb 4, 2025 Page No. 4
Powered by: navbharatlive.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# 'एसएमबीटी' डॉक्टरांकडून मेंदूवर यशस्वी शस्त्रक्रिया

नाशिक : पुढारी वृत्तसेवा

'दुःख अडवायला उंबऱ्यासारखा, मित्र वणव्यामध्ये गारव्या सारखा'. कवी अनंत राऊत यांनी लिहिलेली ही कविता मित्रांच्या नात्याची. त्यांच्याप्रति असलेल्या अनोख्या प्रेमाची आणि अतूट विश्वासाची नेहमीच साक्ष देत असते. अशीच घटना नाशिकमध्ये घडली आणि ४० वर्षांपूर्वीचे वर्गमित्र असलेल्या दोघा मित्रांनी तिसऱ्या मित्राच्या मेंदूवर क्लिष्ट शस्त्रक्रिया केली.

एसएमबीटी हॉस्पिटलचे मेंदू व मणकेविकार तज्ज्ञ डॉ. हितेंद्र गडकरी, भूलज्ज्ञ डॉ. पंकज गुप्ता व जिल्हा वैद्यकीय अधिकारी असलेले डॉ. योगेश (नाव बदललेले) हे वर्गमित्र आहेत. डॉ. योगेश यांना गेल्या काही दिवसांपासून डोकेदुखी, तोल जाणे



असा त्रास होत होता. डॉ. योगेश हे एसएमबीटी हॉस्पिटल येथे मेंदू व मणकेविकार तज्ज्ञ म्हणून कार्यरत असलेले त्यांचे वर्गमित्र डॉ. हितेंद्र गडकरी यांच्याकडे आले. त्यानंतर त्यांच्या सर्व तपासण्या करण्यात आल्या. त्यांना अॅकोस्टिक न्युरोमाची गाठ असल्याचे निष्पन्न झाले. डॉ. गडकरी व डॉ. गुप्ता यांनी सकाळी ९ वाजता सुरू केलेली शस्त्रक्रिया दुपारी ३ पर्यंत चालली. डॉ. योगेश शुद्धीवर आल्यानंतर तिघांच्या मैत्रीचा आनंदोत्सव नातेवाइकांसह उपस्थितांनी साजरा केला.

My Nashik Edition
Feb 01, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

दिनांक -०१/०२/२०२५
दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
www.yuvavarta.com
dailyyuvavarta@gmail.com

# दोघा मित्रांकडून तिसऱ्यावर मेंदूची क्लिष्ट शस्त्रक्रिया

## मित्र वनव्यामध्ये गारव्यासारखा...

नाशिक (प्रतिनिधी)-

दुःख अडवायला उंबऱ्यासारखा, मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा. कवी अनंत राऊत यांनी लिहिलेली ही कविता मित्रांच्या नात्याची, त्यांच्याप्रती असलेल्या अनोख्या प्रेमाची आणि अतूट विश्वासाची नेहमीच साक्ष देत असते. अशीच घटना नाशिकात घडली आणि चाळीस वर्षांपूर्वीचे वर्गमित्र असलेल्या दोघा मित्रांनी तिसऱ्या मित्राच्या मेंदूवर क्लिष्ट शस्त्रक्रिया केली. या अनोख्या घटनेची नाशकात चर्चा असून, डॉक्टरांच्या अनोख्या यारी-दोस्तीचे सध्या कौतुक केले जात आहे.

अधिक माहिती अशी की, एसएमबीटी हॉस्पिटलचे मेंदू व मणकेविकार तज्ञ डॉ. हितेंद्र गडकरी, भूलतज्ञ डॉ. पंकज गुप्ता आणि जिल्हा वैद्यकीय अधिकारी असलेले डॉ. योगेश (नाव बदललेले) हे वर्गमित्र आहेत. डॉ. योगेश यांना गेल्या काही दिवसांपासून डोकेदुखी, तोल जाणे असा त्रास होत होता. त्यांनी जवळच्या एका डॉक्टरांना दाखवले व



येथील डॉक्टरांनी त्यांना मेंदूचा एमआरआय करण्यास सांगितले. दरम्यान, मेंदूत गाठ असल्याचे या तपासणीमध्ये निष्पन्न झाल्यानंतर डॉ. योगेश यांनी मुंबई आणि पुण्यातील काही मेंदू व मणकेविकार तज्ञांचा सल्ला घेतला. येथील सर्वच डॉक्टरांनी त्यांना ऑपरेशन करावे लागेल, याबाबत सांगितले. डॉ. योगेश हे एसएमबीटी हॉस्पिटल येथे मेंदू व मणकेविकार तज्ञ म्हणून कार्यरत असलेले त्यांचे वर्गमित्र डॉ. हितेंद्र गडकरी यांच्याकडे आले. त्यानंतर डॉ. गडकरी यांनी त्यांच्या सर्व तपासण्या करण्यास सांगितल्या. यामध्ये ही गाठ काही प्रमाणात वाढल्याचे निदर्शनास आले. त्यांना अॅकोस्टिक न्युरोमाची गाठ असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे लवकरात लवकर ही गाठ काढून टाकण्याचा सल्ला त्यांनी डॉ. योगेश यांना दिला.

कुठल्याही शस्त्रक्रियेसाठी भूलतज्ज्ञाची भूमिका महत्त्वाची असते. तर ही भूमिका कोण पार पाडणार? असा प्रश्न उपस्थित असताना डॉ. गडकरी यांच्या मदतीला नाशिकचे प्रख्यात भूलतज्ज्ञ व भारतीय भूलतज्ञ असोसिएशनचे डॉ. पंकज गुप्ता धावून आले. योगायोग असा की, डॉ. गुप्ता हेदेखील डॉ. गडकरी आणि डॉ. योगेश यांचे वर्गमित्र असल्याने यारी-दोस्तीच्या या अनोख्या प्रसंगाची सुरुवात झाली. दोघा मित्रांसमोर आता तिसऱ्या डॉक्टर मित्रावर शस्त्रक्रिया करणे मोठे आव्हान होते.

मित्रांनी निर्णय घेतला की, नाशिकात शस्त्रक्रिया करून त्यांना लवकर यातून बाहेर काढू. शस्त्रक्रिया अतिशय क्लिष्ट होती, पण मैत्रीची पकड मजबूत होती. सकाळी ९ वाजता सुरू झालेली शस्त्रक्रिया दुपारी तीन वाजेपर्यंत चालली. शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याचे डॉ. गडकरी आणि डॉ. गुप्ता यांनी बाहेर येऊन नातेवाईकांना सांगितले. डॉ. योगेश यांना शुद्धीवर येण्यासाठी आणखी काही वेळ द्यावा लागणार असल्याने सर्वजण ते शुद्धीवर येईपर्यंत तिथेच थांबून होते. अखेर डॉ. योगेश शुद्धीवर आले आणि मैत्रीचा आनंदोत्सव या तिघांसह उपस्थित सर्वांनीच साजरा केला. या घटनेची माहिती सर्वदूर पोहोचताच अनेकांनी या अतूट मैत्रीचे कौतुक केले.

SMBT

# एसएमबीटी के न्यूरोलॉजिस्ट डॉ. हितेंद्र गडकरी ने की ब्रेन ट्यूमर की सफल सर्जरी

**नाशिक।** एसएमबीटी अस्पताल के मस्तिष्क एवं रीढ़ विशेषज्ञ डॉ. हितेन्द्र गडकरी ने ब्रेन ट्यूमर की सफल सर्जरी की। दुःख को रोकने वाली बाधा की तरह, मित्र अग्नि में पड़े कम्बल की तरह होता है। कवि अनंत राउत द्वारा लिखी गई यह कविता सदैव मित्रों के बीच के बंधन, उनके प्रति उनके अनूठे प्रेम और उनके अटूट विश्वास की गवाही देती है। ऐसी ही एक घटना नाशिक में घटी, जहां दो दोस्तों ने, जो चालीस साल पहले सहपाठी थे, अपने तीसरे दोस्त की जटिल मस्तिष्क सर्जरी की। इस अनोखी घटना की चर्चा नाशिक में हो रही है और डॉक्टरों की अनोखी



दोस्ती की तारीफ हो रही है। अधिक जानकारी यह है कि एसएमबीटी अस्पताल के मस्तिष्क एवं रीढ़ विशेषज्ञ डॉ. हितेन्द्र गडकरी, एनेस्थिसियोलॉजिस्ट डॉ. पंकज गुप्ता और जिला चिकित्सा अधिकारी डॉ. योगेश (बदला हुआ नाम) एक सहपाठी है। डॉ. योगेश पिछले कुछ दिनों से सिरदर्द और संतुलन की समस्या से पीड़ित थे। उन्होंने इसे पास के एक डॉक्टर को दिखाया, जिन्होंने उन्हें मस्तिष्क का एमआरआई कराने को कहा। इस बीच, जांच में ब्रेन ट्यूमर का पता चलने के बाद डॉ. योगेश ने मुंबई और पुणे के कुछ मस्तिष्क और रीढ़ विशेषज्ञों से परामर्श किया। यहां सभी डॉक्टरों ने उसे बताया कि उसे सर्जरी करानी पड़ेगी। डॉ। योगेश, डॉ. के सहपाठी हैं, जो एसएमबीटी अस्पताल में न्यूरोसर्जन के रूप में काम करते हैं। हितेन्द्र गडकरी के पास आये। उसने सारी घटनाएँ बतायीं। तब डॉ. गडकरी ने उनसे कहा कि वे अपनी सारी जांच कर लें। यह देखा गया कि ट्यूमर कुछ हद तक बढ़ गया था।

RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED
शब्दांना सत्याची धार
प्रहार

# मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा!

**दोघा मित्रांकडून तिसऱ्यावर मेंदूची क्लिष्ट शस्त्रक्रिया**

## एसएमबीटीचे मेंदू व मणकेविकारतज्ज्ञ डॉ. हितेंद्र गडकरी यांनी केली यशस्वी शस्त्रक्रिया

◆ नाशिक (प्रतिनिधी) :

दुःख अडवायला उंबऱ्यासारखा, मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा... कवी अनंत राऊत यांनी लिहिलेली ही कविता मित्रांच्या नात्याची, त्यांच्याप्रती असलेल्या अनोख्या प्रेमाची आणि अतूट विश्वासाची नेहमीच साक्ष देत असते. अशीच घटना नाशकात घडली आणि चाळीस वर्षांपूर्वीचे वर्गमित्र असलेल्या दोघा मित्रांनी तिसऱ्या मित्राच्या मेंदूवर क्लिष्ट शस्त्रक्रिया केली. या अनोख्या घटनेची नाशकात चर्चा असून डॉक्टरांच्या अनोख्या यारी-दोस्तीचे सध्या कौतुक केले जात आहे.

एसएमबीटी हॉस्पिटलचे मेंदू व मणकेविकार तज्ञ डॉ. हितेंद्र गडकरी, भूलतज्ज्ञ डॉ. पंकज गुप्ता व जिल्हा वैद्यकीय अधिकारी असलेले डॉ. योगेश (नाव बदललेले) हे वर्गमित्र आहेत. डॉ. योगेश यांना गेल्या काही दिवसांपासून डोकेदुखी, तोल जाणे असा त्रास होत होता. त्यांनी जवळच्या एका डॉक्टरांना दाखवले व येथील डॉक्टरांनी त्यांना मेंदूचा एमआरआय करण्यास सांगितले. दरम्यान, मेंदूत गाठ असल्याचे या तपासणीमध्ये निष्पन्न झाल्यानंतर डॉ. योगेश यांनी मुंबई आणि पुण्यातील काही मेंदू आणि मणकेविकार तज्ज्ञांचा सल्ला घेतला. येथील सर्वच डॉक्टरांनी त्यांना ऑपरेशन करावे लागेल असे सांगितले.

डॉ. योगेश हे एसएमबीटी हॉस्पिटल येथे मेंदू व मणकेविकार तज्ज्ञ म्हणून कार्यरत असलेले त्यांचे वर्गमित्र डॉ. हितेंद्र गडकरी यांच्याकडे आले. डॉ. गडकरी यांना ही गाठ काही प्रमाणात वाढल्याचे निदर्शनास आले. त्यांना ॲकोस्टिक न्यूरोमाची गाठ असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे लवकरात लवकर ही गाठ काढून टाकण्याचा सल्ला त्यांनी डॉ. योगेश यांना दिला.

डॉ. गडकरी यांच्या मदतीला नाशिकचे प्रख्यात भूलतज्ज्ञ व भारतीय भूलतज्ज्ञ असोसिएशनचे डॉ. पंकज गुप्ता धावून आले. योगायोग असा की, डॉ गुप्ता हेदेखील डॉ. गडकरी आणि डॉ योगेश यांचे वर्गमित्र. प्रत्येक व्यक्तीला जीवनात अनेक प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागते. अशा वेळी मित्राचे महत्त्व वाढते. मित्रांनी निर्णय घेतला की, डॉ योगेश यांच्यावर नाशकात शस्त्रक्रिया करून त्यांना लवकर यातून बाहेर काढू. शस्त्रक्रिया अतिशय क्लिष्ट होती पण मैत्रीची पकड मजबूत होती. सकाळी ९ वाजता सुरु झालेली शस्त्रक्रिया दुपारी तीनपर्यंत चालली. डॉ. योगेश शुद्धीवर आले आणि मैत्रीचा आनंदोत्सव या तिघांसह उपस्थित सर्वांनीच साजरा केला.



### अशी झाली शस्त्रक्रिया

लहान मेंदूला चिकटलेली चार बाय तीन सेमीची मोठी गाठ होती. मेंदूतील महत्वाच्या नसांना चिकटलेल्या या गाठीला सोडवून क्यूसा या अत्याधुनिक मशीनद्वारे संपूर्णपणे काढण्यास यश आले. या शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला व्हेंटीलेटरवर ठेवण्याची गरज पडली नाही. एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये ब्रेन व स्पाईन एंडोस्कोपिक सर्जरीच्या माध्यमातून सर्वसामान्य रुग्णांना मोफत उपचारांचा लाभ होणार असल्याचे डॉ. गडकरी म्हणाले.

### महागडे उपचार माफक दरात

मेंदू आणि मणकेविकारावर उपचार महागडे आहेत; परंतु एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये बहुतांश उपचार शासकीय योजनेअंतर्गत मोफत होतात. तर योजनेत न बसणारे उपचार अतिशय माफक दरात होतात. गेल्या ३० पेक्षा अधिक वर्षांपासून मेंदू आणि मणकेविकार उपचार मी करत आहे. दर महिन्यात माझ्या हातून ३०-४० मेंदू व मणकेविकार शस्त्रक्रिया होतात. आज एका मित्रावर यशस्वी उपचार केल्याने या सेवेचे सार्थक झाल्याचा आनंद आहे.

- डॉ. हितेंद्र गडकरी, मेंदू आणि मणकेविकार तज्ज्ञ, एसएमबीटी हॉस्पिटल

Nashik Edition
Feb, 01 2025 Page No, 3
https://epaper.prahaar.in